# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील वाघोली ग्रामपंचायतीच्या वतीने सुरु असलेल्या मनरेगा योजनेतील कामांची चौकशी करण्याबाबत**

**(१) ५३१७० (२८-०४-२०१६). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील वाघोली ग्रामपंचायतीच्या वतीने सुरु असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील कामांची चौकशी करण्याबाबतचे सुमारे २०० नागरिकांच्या स्वाक्षरीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१६-१०-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी विभागीय चौकशी करण्यात आली आहे. चौकशी अहवालानुसार गट वृक्ष लागवडीमध्ये अनियमितता झालेली असून त्यामध्ये अपव्यय झालेला असल्याने सरपंच, सचिव, ग्राम रोजगार सेवक, पॅनल तांत्रिक अधिकारी व विस्तार अधिकारी (कृ) हे दोषी आढळून आले आहेत.

(३) संबंधित ५ अधिकारी, कर्मचारी व पदाधिकारी यांचेकडून रु.८,०२,५३७/- एवढी रक्कम समप्रमाणात वसूल करणे, तसेच संबंधित सचिव यांची एक वेतनवाढ पाच वर्षाकरीता रोखण्यात येत असल्याचे अंतिम शिक्षेचे आदेश दि.१०/०७/२०१७ रोजी देण्यांत आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील चेंढरे ग्रामपंचायत व थळ ग्रामपंचायत येथील सरपंचास पदावर ठेवण्याबाबत

**(२) ६३७५८ (११-०८-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील चेंढरे ग्रामपंचायत व सन २०१५ मधील थळ ग्रामपंचायत येथील तक्रारी अद्याप प्रलंबित असतानाही तेथील सरपंचाना कोकण आयुक्तांनी पदावरुन दुर केले असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सरपंचाची चौकशी प्रलंबित असल्यामुळे त्यांच्या निकाली लागेपर्यंत त्यांना सरपंच पदावर ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-१०-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली जिल्हयात इंदिरा आवास योजनेतील २६८६ घरकुलांची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(३) ६५२५८ (२७-०१-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात इंदिरा आवास योजनेत सन २०११ ते २०१६ या दरम्यान तब्बल २६८६ घरकुलांची कामे प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार इंदिरा आवास योजनेअंतर्गत प्रलंबित घरांची कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१७) :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी चौकशी केली असता लाभार्थ्यांनी घरकुलांची कामे पूर्ण केली नाहीत. तसेच शौचालयाचे अपूर्ण कामे व कामानिमित्त लाभार्थी बाहेरगावी तात्पुरती स्थलांतरित झाली असल्यामुळे घरकुलांची कामे अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) अपूर्ण घरकुले असलेल्या लाभार्थ्यांना घरकुले पूर्ण करण्यासाठी गट विकास अधिकारी व संबंधित तांत्रिक अधिकारी यांचेमार्फत अपूर्ण घरकुले पूर्ण करण्याबाबत नोटिसा देण्यात आल्या आहेत. तसेच, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे स्तरावरुन सर्व संबंधित ग्रामसेवकांना अपूर्ण घरकुले पूर्ण करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे व घरकुले पुर्ण करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सन २०११ मध्ये केलेल्या सर्वेक्षणाच्या यादीतील प्रलंबित लाभार्थ्यांना पंतप्रधान आवास घरकुल योजनेचा लाभ देण्याबाबत**

**(४) ६७३०२ (२७-०१-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील बेघर व पक्के घर नसणाऱ्या लाभार्थींना पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरकुलासाठी दिनांक १५ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास होणाऱ्या ग्रामसभेत नावे सादर करण्याचे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. पुणे यांनी केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्ह्यातील शासनाच्या वतीने सन २०११ मध्ये सामाजिक, आर्थिक व जातीनिहाय केलेल्या गणनेत ४६ हजार लाभार्थींची नावे यादीत असून या सर्वेक्षणामध्ये अनेक बेघर व दारिद्र्यरेषेखालील ग्रामस्थांची नावे या यादीत आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन प्रलंबित लाभार्थींना सदर घरकुल योजनेचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३) शासनाने दि. ०१ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या पत्रान्वये SECC-२०११ मधील माहितीच्या आधारे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण ची प्राधान्यक्रम यादी तयार करण्याबाबत सर्व विभागीय आयुक्त व सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना सूचना दिल्या आहेत.

त्याअनुषंगाने Grnerated Priority List मधील सर्व लाभार्थ्यांची नावे संवर्गनिहाय प्राधान्यक्रम यादी प्रपत्र "अ" मध्ये, घरकुलासाठी पात्र लाभार्थ्यांची नावे प्रपत्र "ब" मध्ये, घरकुलासाठी पात्र नसलेल्या लाभार्थ्यांची नावे प्रपत्र "क" मध्ये व घरकुलासाठी पात्र असलेल्या परंतु Grnerated Priority List मध्ये नावे समाविष्ट नसलेल्या लाभार्थ्यांची नावे प्रपत्र "ड" मध्ये समाविष्ट करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. प्रपत्र "ड" मधील लाभार्थ्यांची निवड तालुकास्तर व जिल्हास्तर अपील समिती यांच्या तपासणीनंतरच अंतिम करण्याच्या सूचना आहेत.

सदर प्रकरणी SECC-२०११ च्या यादीत नाव समाविष्ट न झालेल्या लाभार्थ्यांची नावे ग्रामसभेच्या मान्यतेने प्रपत्र ड मध्ये घेण्यात आली आहेत. परंतु अशा लाभार्थ्यांची पात्रता तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय समितीच्या तपासणी नंतरच अंतिम होणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाड (जि.रत्नागिरी) येथील सावित्री पुल दुर्घटनेतील मृतांच्या मृत्यू दाखल्यात तफावत असल्याबाबत**

**(५) ६८१०७ (२७-०१-२०१७). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रत्नागिरी) येथील सावित्री पुल दुर्घटनेतील मृतांचे महाड पंचायत समिती आणि ज्या गावात मृतदेह सापडले तेथील ग्रामपंचायतीकडून तयार केलेल्या मृत्यू दाखल्यात तफावत झाल्याचे दिसून येत असून सदर मृत्यू प्रमाणपत्रावर मृताच्या नातेवाईकांकडून आक्षेप घेतला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर दाखल्याबाबत ग्रामपंचायतीकडून माहिती घेऊन बदलण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-१०-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील नीरा-देवधर धरणग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(६) ७००१९ (२७-०१-२०१७). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील नीरा-देवधर धरणग्रस्तांचे २० वर्षापासून पुनर्वसन झाले नसल्याने प्रकल्पग्रस्त असल्याचे त्यांना दाखले मिळत नाहीत तसेच नवीन पुनर्वसन गावठाणात सुविधांचा अभाव असल्याचे ही माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी मा.जलसंपदा राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २० नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास बैठक झाली होती मात्र त्याला ७ महिने होऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन या प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पग्रस्त असल्याचे दाखले देवून त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१७) :** (१) पुणे जिल्हयातील नीरा-देवधर प्रकल्पामुळे बाधीत झालेल्या एकूण ८ पूर्णत: व १२ अंशत: गावातील प्रकल्पग्रस्तांचे खंडाळा व फलटण तालुक्यामध्ये १३ नवीन पुनर्वसित गावठाणांमध्ये, बहुतांश  नागरी सुविधा देवून सन १९९९-२००० दरम्यान पुनर्वसन करण्यात आले आहे.
(२) नीरा-देवधर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन विषयक कामकाजाचा आढावा घेण्यासाठी  मा. राज्यमंत्री (जलसंपदा) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ४/१/२०१६ रोजी महसूल व जलसंपदा विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांच्या समवेत बैठक घेण्यात आली होती.
(३) प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात येणारी पर्यायी जमीन, दाखले व भूखंड वाटप ही कार्यवाही महसूल विभागाशी संबंधित असून याबाबत जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे व सातारा यांच्यामार्फत  कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात पाच ठिकाणी वन उद्याने उभारण्याबाबत**

**(७) ७३९६० (१७-०४-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नागपूर, चंद्रपूर, यवतमाळ व पुण्यात दोन अशा पाच ठिकाणी केंद्र शासनाच्या वन उद्यान योजनेअंतर्गत वन उद्यानांना मान्यता दिली असल्याचे माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर, चंद्रपूर, यवतमाळ व पुण्यात उभारण्यात येणाऱ्या वन उद्यानांच्या विकासासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, सदरील ठिकाणी वन उद्याने उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-१०-२०१७) :** (१) होय.
(२) होय.
(३) यवतमाळ येथील नगर वन उद्यानात राज्य योजनेंतर्गत निधी उपलब्ध झाला असल्याने या उद्यानाऐवजी कोल्हापूर येथे नगर वन उदयान निर्माण करण्याच्या प्रस्तावास Ad Hoc CAMPA यांनी मंजूरी दिली आहे. त्यानुसार नगर वन उदयानाची कामे प्रगतीप्रथावर आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील धनगरवाडे मुलभूत सुविधांपासून वंचित असल्याबाबत**

**(८) ७६३६७ (१५-०४-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पश्चिम भागातील धनगरवाडे ओस पडू लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलभूत सुविधांचा अभाव, वन्य प्राण्यांचा वाढता उपद्रव त्यामुळे शेती करणे गैरसोयीचे झाले असल्याचे धनगर वाड्यांवरील लोक शहराकडे स्थलांतर करीत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धनगरवाड्यांमध्ये मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०९-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) शाहूवाडी तालुक्यामध्ये अंदाजे ७६ धनगरवाडे असून त्यापैकी १ धनगरवाडा पूर्ण स्थलांतरीत झालेला आहे. उर्वरित ७५ धनगरवाड्यांपैकी ६३ धनगरवाड्यांमध्ये रस्ते, ७४ धनगरवाड्यांमध्ये घरगुती वीज, ७४ धनगरवाड्यांमध्ये पाणी, ३१ धनगरवाड्यांमध्ये आरोग्य, ६६ धनगरवाड्यांमध्ये शैक्षणिक सुविधा तसेच १३ धनगरवाड्यांमध्ये पशुवैद्यकीय दवाखाना इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत.तसेच १४ वा वित्त आयोगाच्या अनुदानामधून ग्रामपंचायतींनी विकास आराखडे तयार केलेले आहेत. सदर आराखड्यांमध्ये प्राधान्याने ज्या दुर्गम धनगरवाड्यांवर मुलभूत सुविधा उपलब्ध नाहीत त्या ठिकाणी मुलभूत सुविधा निर्माण करण्याची कामे निवडण्यात आली असून तीच कामे तात्काळ पूर्ण करुन घेणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. कोल्हापूर यांचेमार्फत ग्रामपंचायतींना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्हयातील अकोले पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या सुशोभिकरणास घसारा निधीतून खर्च करण्यास मान्यता मिळण्याबाबत

**(९) ७८१९१ (१४-०४-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील अकोले पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या सुशोभिकरणास घसारा निधीतून खर्च करण्यास मान्यता मिळण्याबाबत व इमारतीच्या अंतर्गत फर्निचर सुविधा व इतर उपक्रमास निधी मिळण्याबाबतची मागणी मा.ग्रामविकास व मा.जलसंधारण मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार सदर इमारतीच्या सुशोभिकरणास घसारा निधीतून खर्च करण्यास मान्यता मिळण्यासह इमारतीच्या अंतर्गत फर्निचर व इतर उपक्रमासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०९-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) अहमदनगर जिल्ह्यातील अकोले पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या सुशोभीकरणास घसारा निधीतून खर्च करण्यास शासन पत्र दिनांक ६.६.२०१६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदरचे काम सद्यस्थितीत निविदा प्रक्रीयेमध्ये आहे.

जिल्हा परिषदेच्या मागणीनुसार, अकोले पंचायत समितीच्या फर्निचर व उपकामांकरीता सन २०१५-१६ मध्ये रु. ५५.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. यापुर्वी वितरीत केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर उर्वरीत निधी जिल्हा परिषदेला वितरीत करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हा परिषदेच्या अंतर्गत असलेल्या मासवण-काटाळे-नागझरी रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(१०) ८१९५७ (१७-०४-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) पालघर जिल्हा परिषदेच्या अंतर्गत असलेला मासवण-काटाळे-नागझरी या जवळपास ९ किमीच्या रस्त्याची अतिशय दुरवस्था झालेली असून रस्त्यांतील खड्यात पडून अनेक अपघात झालेले आहेत तसेच या रस्त्यासाठी १ कोटी १५ लाखांचा निधी मंजूर असूनही रस्त्यांचे काम अद्यापी सुरु करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यांची पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीनुसार सदर रस्ते दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०९-२०१७) :** (१) ते (३) रस्त्याची दुरावस्था झाली आहे हे खरे आहे. तथापि, मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत या रस्त्याचे रु.५ कोटी २९ लक्ष किंमतीचे काम मंजूर असून प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील समाजकल्याण (जि.प.) निधीतून बांधण्यात आलेल्या शौचालयाची कामे बेकायदेशीरपणे तोडल्याबाबत**

**(११) ८२१५१ (१९-०४-२०१७). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यातील समाजकल्याण (जि.प.) निधीतून बांधण्यात आलेल्या शौचालायाची कामे बेकायदेशीरपणे तोडल्याबाबत संबंधितांवर कारवाई करण्याबाबतचे तक्रारी अर्ज माजी उपसरपंच, राहटोली यांनी जिल्हाधिकारी ठाणे, मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प. ठाणे, गटविकास अधिकारी, अंबरनाथ यांचेकडे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार बेकायदेशीरपणे सार्वजनिक शौचालय तोडणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०९-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) श्रीम.स्मिता जिंतूरकर, पशूधन विकास अधिकारी, श्री. आर.एच. पाटील, कृषी अधिकारी व श्री. एम.डी. क्षिरसागर, उपअभियंता बांधकाम यांना दि. १९/२/२०१७ रोजी चौकशी करण्याबाबत आदेश देण्यात आले. याखेरीज दि. २४/३/२०१७ रोजी व्हिडीओ रेकॉर्डींग करून १३ ग्रामस्थांचे जबाब नोंदविण्यांत आले.

सदर बांधण्यात आलेले शौचालय मोडकळीस आल्यामुळे कोसळले व वापरात नसल्याचे बहूसंख्येने जबाबात नमूद केले आहे. ग्रामस्थांचे जबाब व पंचनामे तसेच ग्रामपंचायत,रहटोली यांनी सादर केलेल्या मासिक सभेचा ठराव यावरून शौचालय तोडल्याचे निदर्शनास येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्हयातील ग्रामपंचायतींचे विभाजन करून नवीन ग्रामपंचायती निर्माण करण्याबाबत**

**(१२) ८२३२१ (१४-०४-२०१७). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयात १६८८ हून अधिक गावे असून त्यापैकी फक्त ४६७ ग्रामपंचायती आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयात एका ग्रामपंचायतीमध्ये अनेक गावे असलेली असंख्य ग्रामपंचायती असल्याने जिल्हयातील गावांचा विकास होण्यास अडथळा निर्माण होत असून अशा ग्रामपंचायतींचे विभाजन करून नवीन ग्रामपंचायतीची निर्मिती करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०९-२०१७) :** (१) व (२) गडचिरोली जिल्ह्यामध्ये एकूण ४५६ ग्रामपंचायती असून, त्यापैकी १०४ स्वतंत्र ग्रामपंचायती आहेत. उर्वरित ३५२ गट ग्रामपंचायतींमध्ये एकूण १४८६ गावे समाविष्ट आहेत.

एका गट ग्रामपंचायतीमध्ये अनेक गावे असली तरी, गट ग्रामपंचायती अंतर्गत असणाऱ्या गावांचा देखील विकास करण्यात येत आहे.
(३) व (४) स्वतंत्र ग्रामपंचायती स्थापन करण्याच्या अनुषंगाने शासन निर्णयातील निकषांनुसार प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत.

---

**राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ करण्याबाबत**

**(१३) ८२३६२ (१७-०४-२०१७). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना किमान वेतनानूसार वेतन लागू असुन सदर वेतन अत्यंत अत्यल्प आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाढत्या महागाईचा विचार करता ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०९-२०१७) :** (१), (२) व (३) राज्यातील ग्रामपंचायत कर्मचा-यांना कामगार विभागाकडून निश्चित केलेल्या दराप्रमाणे किमान वेतन देण्यात येते. कामगार विभागाकडून वेळोवेळी यामध्ये वाढ करण्यात येते व त्यानुसार सदर वाढही ग्रामपंचायत कर्मचा-यांना देण्यात येते. सध्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन अधिसूचना दिनांक ०७ ऑगस्ट, २०१३ नुसार किमान वेतन निश्चित करण्यात आले असून त्यानुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना वेतन देण्यात येत आहे.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या उपरोक्त नमूद वेतना व्यतिरिक्त ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना वाढत्या महागाईचा विचार करून कामगार विभागाने निश्चित केलेला राहणीमान भत्ता देण्यात येतो. तसेच सदर राहणीमान भत्त्यामध्ये कामगार विभागाने वेळोवेळी केलेली वाढ ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना लागू करण्यात येते.

---

**अकोला जिल्हा परिषदेचा शिल्लक निधी विकास कामासाठी वापरण्याबाबत**

**(१४) ८२३८९ (१४-०४-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा परिषदेचा २०१६-१७ साठीचा ४४ कोटी ६७ लाख ८३ हजार निधी शिल्लक असून हा निधी खर्च करण्याचा आदेश जिल्हा परिषदेच्या अर्थ समितीच्या सभेत देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निधी अद्यापही खर्च न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार हा निधी तातडीने खर्च करून विकास कामे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०९-२०१७) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) वैयक्तीक लाभांच्या योजनांमध्ये DBT साठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पुर्तता न झाल्याने योजना पूर्ण होऊ शकल्या नाहीत. तसेच,काही कामे प्रगतीपथावर असून ती कामे पूर्ण न झाल्याने निधी अखर्चीत राहिला आहे.
(३) जिल्हा परिषदेला प्राप्त होणारा निधी त्या आर्थिक वर्षात खर्च झाला नाही तर असा निधी शासन निर्णय, वित्त विभाग दिनांक ६ जून २००८ नुसार पुढील वित्तीय वर्षात खर्च करण्याची अनुमती आहे. त्यानुसार खर्चाचे नियोजन करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील धरणांच्या सुरक्षिततेबाबत

**(१५) ८२४५५ (१७-०४-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात सिंचनाचे क्षेत्र वाढविण्यासाठी विविध धरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर जलाशयाचा साठा असल्याने या धरणांच्या सुरक्षिततेसाठी शासनाने उपाययोजना आखावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने विविध धरणांच्या सुरक्षिततेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-०८-२०१७) :** (१) नाही.
(२) कोकण पाटबंधारे विकास महामंडळातर्गत ता.राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील २ मध्यम प्रकल्प, ८ लघु पाटबंधारे प्रकल्प आणि १ को.प. बंधारा असे एकुण ११ राज्यस्तर पाटबंधारे प्रकल्प आहेत. या प्रकल्पांपैकी ८ प्रकल्पांच्या धरणाची कामे पूर्ण होऊन पाणीसाठा झालेला आहे. त्यापैकी दिवाळवाडी, बारेवाडी व कोंडये या तीन ल.पा. योजनांवर प्रत्येकी एका चौकीदाराची नेमणूक केली आहे. अर्जुना मध्यम प्रकल्प, चिंचवाडी व तळवडे ल.पा.योजना या प्रकल्पांचे धरणक्षेत्रावर सुरक्षा रक्षक नेमणूकीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजापूर (जि. रत्नागिरी) तालुक्यातील करक गावातील अर्जुना धरण व तळवडे गावातील धरणांच्या कालव्यांची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(१६) ८२४६० (१९-०४-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **लाभक्षेत्र विकास विभाग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि. रत्नागिरी) तालुक्यातील करक गावातील अर्जुना धरण व तळवडे गावातील धरणाचे काम पूर्ण झालेली असून कालव्यांची कामे प्रलंबित असल्याने नजीकच्या गावांना पाण्यासाठी वंचित राहावे लागले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू धरणांच्या कालव्याची कामे तातडीने पूर्ण करून धरणालगतच्या गावांना पाणी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-०९-२०१७) :** (१) होय.

अर्जूना मध्यम पाटबंधारे प्रकल्प- सदर प्रकल्पातंर्गत ५७०४ हेक्टर सिंचन निर्मितीसाठी खालील प्रमाणे कालव्यांची कामे प्रस्तावित आहेत.

| अ.क्र. | कालवा | लांबी |
|---|---|---|
| १ | मुख्य कालवा | ०.२८ कि.मी. |
| २ | उजवा कालवा | ५७.०० कि.मी. |
| ३ | डावा कालवा | ३८.७५ कि.मी. |
| ४ | ताम्हणे उजवा शाखा कालवा | १२.२२ कि.मी. |
| ५ | ताम्हणे डावा शाखा कालवा | ०९.६९ कि.मी. |
| **एकूण** | | **११७.९४ कि.मी.** |

या पैकी प्रकल्पाच्या डावा कालव्याचे १ ते १६ कि.मी. मधील ९० % व उजव्या कालव्याचे १ ते १७ कि.मी. मधील ५० % कामे पुर्ण झाली आहेत.

तळवडे लघु पाटबंधारे प्रकल्प- सदर प्रकल्पाअंतर्गत २५९ हेक्टर सिंचन निमिर्तीसाठी खालील प्रमाणे कालव्यांची कामे प्रस्तावित आहेत.

| अ.क्र. | कालवा | लांबी |
|---|---|---|
| १ | उजवा कालवा | २.२५ कि.मी. |
| २ | डावा कालवा | १०.११ कि.मी. |
| **एकूण** | | **१२.३६ कि.मी.** |

यापैकी प्रकल्पाच्या उजव्या कालव्याचे १ ते १.५० कि.मी. चे काम पुर्ण झालेले आहे. डावा कालवा १ ते ६ कि.मी. ची कामे अंशत: झालेली आहेत.

(२) अर्जूना मध्यम पाटबंधारे प्रकल्पाच्या कालव्यांची उर्वरित कामे तातडीने पूर्ण करणेच्या दृष्टीने निधी उपलब्धतेसाठी प्रकल्पास प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत केंद्रिय अर्थसहाय प्रस्तावित आहे. सन २०१७-१८ साठी अर्थसंकल्पात रू. ५०.०० कोटीची तरतुद असून निधी उपलब्धतेनुसार सन २०१९-२० पर्यंत कालव्याची कामे पुर्ण करून ५७०४ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्मितीचे नियोजन आहे.

अर्जुना प्रकल्पाच्या डावा कालवा कि.मी. ३ मधील सा.क्र. २६४३ मी. वरील Minor M-१ व डावा कालवा कि.मी. ५ मधील सा.क्र. ४९७५ मी. वरील Minor M-२ या दोन्ही Minor ची लांबी वाढवून तळवडे योजनेचे संपूर्ण २५९ हेक्टर लाभक्षेत्र अर्जूना प्रकल्पांतर्गत बंदिस्त नलिका प्रणालीद्वारे सिंचित करणे प्रस्तावित आहे.

तळवडे लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या कालव्यावरील लाभक्षेत्र हे अर्जुना प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात आच्छादित होते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील कंत्राटी हातपंप दुरुस्ती कामगारांना नियमित सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(१७) ८२४९७ (१४-०४-२०१७). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात हातपंप दुरुस्ती कामगारांना सेवा जेष्ठता यादीनुसार नियमित सेवेत सामावून घेण्यात येते परंतु भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील कंत्राटी हातपंप दुरुस्ती कामगारांना नियमित सेवेतून वगळण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केल आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील कंत्राटी हातपंप दुरुस्ती कामगारांना नियमित सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-०९-२०१७) :** (१), (२) व (३) हातपंप दुरुस्ती कामगारांची नियुक्ती मानधन तत्वावर कंत्राटी स्वरुपात करण्यात येते. सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही-२००५/प्र.क्र.४७/०५/१२, दि. २५/८/२००५ अन्वये राज्यातील जिल्हा परिषदेमध्ये विविध पदावर कामे करणा-या रोजंदारी/अंशकालीन/तात्पुरत्या सेवेतील कर्मचा-यांना नियमित करु नये, अशा आशयाचे आदेश दिले आहेत. सदर कर्मचारी शासनाचे स्थायी कर्मचारी नसल्यामुळे त्यांना शासन सेवेत सामावून घेता येणार नाही.

(४) लागू नाही.

---

**मुर्तिजापूर (जि.अकोला) तालुक्यातील लागवड अधिका-यांने केलेला गैरव्यवहार**

**(१८) ८२५१५ (१५-०४-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुर्तिजापूर (जि.अकोला) तालुक्यातील सिरसो येथील मग्रारोहयोची रोपवाटिका मागील १० वर्षांपासून बंद करून ग्रामसभेमध्ये कृती आराखडा मंजूर नसताना व रोजगार हमी योजनेच्या अटीकडे दुर्लक्ष करून लागवड अधिका-यांनी शहरापासून अंतरावर असलेल्या वडगाव येथे कामाला सुरुवात केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लागवड अधिका-यांच्या गैरकारभाराबाबत त्यांच्यावर वरिष्ठ अधिकाऱ्याने कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार लागवड अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२५-०९-२०१७) :** (१) मुर्तिजापूर तालुक्यातील शिरसो येथील मग्रारोहयोची रोपवाटिका तांत्रिक अडचणींमुळे मागील १ वर्षापासून बंद करण्यात आली आहे. मग्रारोहयो अंतर्गतच्या सर्व रोपवाटीका अस्थायी स्वरुपाच्या असतात. तसेच मग्रारोहयोची कामे मागणीनुसार प्रस्तावित केली जातात. पावसाळ्यामध्ये रोपे वाहतुकीमध्ये अडचणी येऊ नयेत म्हणून जेथे काम तेथे जवळच रोपवाटीका घेण्यात येतात.

वडगाव येथील रोपवाटीका ही सर्व दृष्टीकोनातून योग्य असल्यामुळे व नियमानुसार ग्रामसभेमध्ये पुरवणी कृती आराखडयामध्ये समाविष्ट करुन तहसिलदार, मुर्तिजापूर यांचे प्रशासकीय मंजूरी क्र.४८८ दि.१७.१०.२०१६ नुसार मंजूरी घेऊन आवश्यकतेनुसार सुरु करण्यात आलेली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामीण महाराष्ट्रातील नागरिकांचे जीवनमान सुसहय करण्यासाठी प्रस्तावित केलेली संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र-संग्राम योजना

**(१९) ८२६०२ (१४-०४-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः ग्रामीण महाराष्ट्रातील नागरिकांचे जीवनमान सुसहय करण्यासाठी प्रस्तावित केलेली संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र-संग्राम या प्रणालीद्वारे विभक्षित संगणकीय सोयी-सुविधांचा लाभ प्रत्यार्पित करण्याच्या दृष्टीकोनातून संबंधित जिल्हा परिषद व त्यांची उपकार्यालय यांच्याकडे माहे मार्च, २०१७ अखेरपर्यंत विविध प्रकारच्या सुविधा प्रत्यार्पित करण्याची मागणी संबंधित जिल्हा ग्रामीण प्रशासन व त्यांच्या व्यवस्थापनाने, जनप्रतिनिधी यांनी राज्याचे मा.ग्रामविकास मंत्री, मा.ग्रामविकास राज्यमंत्री, प्रधान सचिव, ग्रामविकास, संबंधित जिल्हयांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०९-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

तसेच, शासन निर्णय क्र. संग्राम-२०१५/प्र.क्र.९३/संग्राम कक्ष दि. ११ ऑगस्ट, २०१६ अन्वये राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये “आपले सरकार सेवा केंद्र (ASSK)” या प्रकल्पाची उभारणी व अंमलबजावणी करण्यात येत आहे. याद्वारे प्रत्येक गावातील जनतेला सर्व सुविधा संगणकीय प्रणालीद्वारे गावातच उपलब्ध करण्यात येत आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कारंजा (जि.वाशिम) येथील उबर्दा बाजार उपसासिंचन योजनेचे काम सुरु करण्याबाबत**

**(२०) ८२६८८ (१५-०४-२०१७). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारंजा (जि.वाशिम) येथील उबर्दा बाजार उपसासिंचन योजनेचे काम सुरु करण्याबाबतच्या मागणीचे निवेदन लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक २२ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०८-२०१७) :** (१) होय.

(२) उंबर्डा बाजार उपसा सिंचन योजनेवरील विविध अडचणी लक्षात घेता व या योजनेसाठी आवश्यक असलेले पाणी उपलब्ध होत नसल्याने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर नियामक मंडळाच्या दि.०४/११/२०१६ रोजी झालेल्या ६० व्या बैठकीतील ठराव क्र.६०/२१ अन्वये उंबर्डा उपसा सिंचन योजना रद्द करण्यास मंजूरी प्रदान करण्यात आलेली असून, त्यानुसार सदर योजना रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बागलाण (जि.नाशिक) तालुक्यातील इंदिरा आवास व पंतप्रधान आवास योजनेच्या अंतिम यादीत नावे असलेल्या लाभार्थ्यांकडून लाच घेतल्याबाबत**

**(२१) ८२७८९ (१७-०४-२०१७). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बागलाण (जि.नाशिक) तालुक्यातील जामोटी ग्रुप ग्रामपंचायतीत इंदिरा आवास, पंतप्रधान आवास योजनेच्या अंतिम यादीत नावे असलेल्या लाभार्थ्यांकडून प्रत्येक तीन हजार रुपये घेतल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधितावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०९-२०१७) :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांनी ठेकेदाराशी संगनमत करून केलेला गैरव्यवहार**

**(२२)  ८२९०५ (१९-०४-२०१७).  श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांनी नागरी सुविधासाठी अनुदान देण्याच्या दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या आदेशात ग्रामपंचायत यांनी गटविकास अधिकारी यांच्यामार्फत पाठविलेल्या व लोकप्रतिनिधी यांनी शिफारस केलेला प्रस्ताव न घेता ठेकेदारांनी शिफारशीप्रमाणे चांदोरी व विंचूर येथील कामे मंजूर केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार ठेकेदाराशी संगनमत करणाऱ्या मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प नाशिक यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०९-२०१७) :** (१) जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत नागरी सुविधांसाठी विशेष अनुदान या योजनेंतर्गत ता. निफाड, जि. नाशिक येथील ग्रामपंचायत चांदोरी व विंचुर येथील कामांना प्रशासकीय मान्यता दिलेबाबतचा आदेश दिनांक ७/१०/२०१६ रोजीचा नसून, दि. ७/११/२०१६ रोजीचा आहे.

ग्रामपंचायत चांदोरी, ता. निफाड येथील प्रस्ताव जिल्हाधिकारी, नाशिक यांचे जा. क्र. जिनिस/कक्ष.१२/संस-४/लोप्रमा/२२२७, दि. ३/९/२०१६ चे पत्रानुसार मा. पालकमंत्री, नाशिक यांच्या शिफारशीसह जिल्हा परिषदेस पाठविण्यात आला होता. सदर प्रस्तावासोबत असलेल्या मा. पालकमंत्री यांनी शेरांकित केलेल्या पत्राच्या आधारे ग्रामपंचायत चांदोरी येथील शनिमंदिर ते मस्जिद रस्ता काँक्रीटीकरण करण्याच्या कामास प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे.

श्री. ज्ञानेश्वर दगु पवार, मा. जिल्हा परिषद सदस्य, गट विंचूर, ता. निफाड यांचे शिफारशीसह गट विकास अधिकारी, निफाड यांचेमार्फत प्राप्त झालेल्या ग्रामपंचायत विंचूर, ता. निफाड येथील शिवाजी नगर ते सर्व्हिस स्टेशन रस्ता काँक्रीटीकरण करण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली आहे.

सबब, जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत नागरी सुविधांसाठी विशेष अनुदान या योजनेंतर्गत प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेल्या ग्रामपंचायत चांदोरी व विंचुर येथील कामांना ठेकेदारांची शिफारस नसून, मा. लोकप्रतिनिधींनी केलेल्या शिफारशीस अनुसरुन मंजुरी देण्यात आलेली आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचांबे पुनर्वसन खेरशेत (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या पुनर्वसित गावठाणामध्ये नागरी सुविधांची कामे पुर्ण करण्याबाबत**

**(२३) ८३३६२ (१३-०४-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाचांबे पुनर्वसन खेरशेत (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या पुनर्वसित गावठाणामध्ये संरक्षक भिंती, अंतर्गत रस्ते, गटार, विहीर, दिवाबत्ती इत्यादी कामे अद्यापही अपूर्ण असल्याने प्रकल्पग्रस्त नागरिकांनी दिनांक २६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास आमरण उपोषण केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तद्नुसार शासनाने सदरहू पुनर्वसित गावठाणामध्ये नागरी सुविधांची अपुर्ण कामे पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०९-२०१७) :** (१) दि.२६/०१/२०१७ रोजी प्रकल्पग्रस्तांनी गावठाणातील अपूर्ण कामांबाबत उपोषणाचा इशारा दिला होता. तथापी त्यांच्या मागण्यांबाबत ठोस कार्यवाही सुरु असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी उपोषण स्थगित केले आहे.
(२) खेरशेत पुनर्वसन गावठाणातील नागरी सुविधा कामे सन २००७ मध्ये सुमारे १० वर्षापूर्वी पूर्ण झाली असून पुनर्वसन अधिनियम १९९९ नुसार सर्व नागरी सुविधांची कामे पूर्ण आहेत. यापैकी वीज पुरवठा व पाणी पुरवठा वगळता सर्व नागरी सुविधा जिल्हा परिषद, रत्नागीरी, यांचेकडे हस्तांतरीत करणेत आलेल्या आहेत.

प्रकल्पग्रस्तांनी केलेल्या आग्रही मागणीनुसार संरक्षक भिंती, विहीर बांधणे, पाखाडी, अंतर्गत रस्ते डांबरीकरण व इतर अनुषंगिक कामांपैकी LED विद्युतीकरण, पाखडी बांधणे या मंजूर कामांची निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.

उर्वरित कामांच्या मंजूरीबाबत आवश्यक पाठपूरवठा क्षेत्रीय स्तरावर करणेत येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे खचलेल्या व बुजलेल्या विहीरींच्या दुरुस्तीची कामे पूर्ण करण्याबाबत

**(२४) ८३४१३ (१५-०४-२०१७). डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यात दिनांक ३१ मे, २०१५ रोजी पूर्वी एकूण ५१० सिंचन विहीरींच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिलेली होती व त्यापैकी १५० सिंचन विहीरींची कामे प्रत्यक्ष सुरु झाली असुन ३६० सिंचन विहीरींची कामे सुरु करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन परिपत्रक क्रं. मग्रारो-२०१४/प्र.क्रं.२५/मग्रारो-१ दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ नुसार दिनांक २३ मे, २०१४ च्या शासन निर्णयानुसार सुरु असलेल्या दुरुस्तीची कामे पूर्ण करणे आवश्यक आहे असे नमुद केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शासन निर्णयानुसार अतिवृष्टीमुळे खचलेल्या व बुजलेल्या विहीरींची व प्रशासकीय मान्यता प्राप्त परंतु प्रत्यक्ष कामे सुरु न झालेल्या विहीरींच्या दुरुस्तीची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (११-०९-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३) प्रशासकीय मान्यता प्राप्त परंतु प्रत्यक्ष कामे न सुरु झालेल्या सदर कामांना शासन पत्र दि.२२ फेब्रुवारी, २०१६ अन्वये दिनांक ३१ मे, २०१७ पर्यंत कामे पूर्ण करण्याबाबत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यामुळे ३६० विहिरींपैकी २८० कामे सुरु करण्यात आलेली आहेत. अद्यापही सुरु न झालेली ८० कामे सुरु करण्याबाबत लाभार्थ्यांच्या बैठका घेण्यात आलेल्या आहेत. तसेच, त्यांना लेखी सुद्धा कळविण्यात आलेले आहे. विहिरी सुरु करण्याबाबत सतत पाठपुरावा करण्यात येत असून, संबंधितांना दिनांक ३१ मे, २०१७ पर्यंत विहिरी पूर्ण करावयाच्या असल्याबाबत जाणीव करुन देण्यात आली असून विहीरी पूर्ण करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हा परिषदेत वैयक्तिक लाभाच्या योजनांपासून गरजू लाभार्थी वंचित राहिल्याबाबत

**(२५) ८३५२२ (१७-०४-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने वैयक्तिक लाभाच्या योजनांच्या निधीचे इतरत्र वर्गीकरण केल्यामुळे जिल्ह्यातील अनेक गरजू लाभार्थी या योजनेपासून वंचित राहिल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गरजू लाभार्थ्यांपर्यंत सदर योजना पोहचण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

माहे डिसेंबर, २०१६ मध्ये झालेल्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये जि.प. निधीच्या खर्चाचा आढावा घेतला असता जि.प. अंदाजपत्रकातील काही निधी टेंडर प्रक्रिया पूर्ण न झाल्याने तसेच काही कामे पुर्ण न झाल्याने अखर्चित राहील्याचे निदर्शनास आले. तसेच नियोजन विभाग शासन निर्णय दि. ०५/१२/२०१६ नुसार वस्तूस्वरुपात लाभ न देता रक्कम थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये वर्ग करावयाची असल्याने व सदर कार्यप्रणालीबाबत स्पष्टता होत नसल्याने वैयक्तीक लाभाच्या योजनांची अमंलबजावणी उर्वरित कालावधीत करणे शक्य होत नसल्याचे निदर्शनास आले. याबाबत जि.प. सर्वसाधारण सभेत झालेल्या चर्चेनुसार सदर रकमांचे पुनर्विनियोजन महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ चे कलम १३८ (२) अन्वये जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दि. १९/१२/२०१६ नूसार त्याच विभागांचे इतर योजनांसाठी पुनर्विनियोजन करणेबाबत ठराव मंजूर करण्यात आलेला आहे. त्यानूसार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये सदरचे पुनर्विनियोजन करण्यात आलेले आहे.

(२) विविध कल्याणकारी योजनांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनेबाबत लाभार्थ्यांना वस्तुस्वरुपात लाभ न देता थेट रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्याबाबत नियोजन विभाग शासन निर्णय दि. ०५/१२/२०१६ अन्वये शासनाने धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार कार्यवाही केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भंडारा जिल्ह्यातील रस्ते दुरुस्त करण्याबाबत

**(२६) ८३५४१ (२०-०४-२०१७). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील ग्रामीण मार्गाची लांबी ३३२६.६६ किलोमीटर, इतर जिल्हा मार्गाची लांबी १५६२ किलोमीटर व प्रमुख जिल्हा मार्गाची लांबी १५६१.८७ किलोमीटर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्गाच्या निर्मिती दुरुस्तीकरिता सरासरी विविध लेखाशीर्षांतर्गत १५ कोटी एवढी रक्कम शासनामार्फत दिली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने रस्ते विकासाकरिता जिल्ह्यातील इतर जिल्हा मार्गावर बांधकाम विभागाकडून रस्त्याची कामे केली जाणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रस्त्याची दुरुस्ती तात्काळ करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०९-२०१७) :** (१) भंडारा जिल्हयातील ग्रामीण मार्गाची लांबी ३३२३.८६ कि.मी., इतर जिल्हा मार्गाची लांबी १५६१.८७ कि.मी व प्रमुख जिल्हा मार्गाची लांबी ६७४.५० कि.मी.इतकी आहे.

(२) ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्गाच्या दुरुस्तीकरीता विविध लेखाशिर्षांतर्गत सरासरी रु.१९ ते २० कोटी एवढी रक्कम जिल्हा परिषदेस प्राप्त होते.

(३) व (४) लेखाशिर्ष ५०५४ अंतर्गत जिल्हा नियोजन समिती व ३०५४ रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण या कार्यक्रमांतर्गत प्राप्त झालेल्या निधीमधून इतर जिल्हा मार्गाची कामे प्रगतीपथावर आहेत.

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीमधून तालुका स्तरावर (PCI) आधारे प्राधान्यक्रम याद्या तयार करुन या प्राधान्यक्रम यादीनुसार/ गुणांकनानुसार पात्र रस्ते निवडण्याचे व या आधारे रस्त्याचे दुरस्तीचे काम घेण्याबाबत शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, दि.३ सप्टेंबर, २०१६ अन्वये मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

सन २०१६-१७ पासून मुख्यमंत्री ग्राम सडक योजना सुरु करण्यात आली असून या योजनेअंतर्गत कोअर नेटवर्क तयार करुन दरवर्षी विशिष्ट लांबी निश्चित करुन त्याप्रमाणे उपलब्ध होणाऱ्या निधीमधून ग्रामीण रस्त्यांची कामे करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तापी खोऱ्यातील निम्न तापी प्रकल्पासाठी निधी मिळण्याबाबत**

**(२७) ८३६७४ (१८-०४-२०१७). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तापी खोऱ्यातील निम्न तापी प्रकल्प (पाडळसरे) हया प्रकल्पाला १९९५-९६ मध्ये प्रशासकिय मान्यता देतेवेळी या प्रकल्पाचा खर्च १४२ कोटी रुपये इतका होता व सन २००८-२००९ च्या प्रशासकिय मान्यतेनुसार हा खर्च रुपये ११२७ कोटी इथपर्यत पोहचला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाची जळगांव जिल्हयातील सिंचन क्षमतेने अमळनेर पोराळा, चोपडा, धरणगांव तालुक्यातील ६०,१३९ हेक्टर तर धुळे जिल्हयात ३५१७. हे क्षेत्र भिजले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ह्या प्रकल्प जलदगतीने पाच वर्षात पूर्ण करण्यासाठी शासनाकडून दरवर्षी २०० रु कोटीची गरज असतांना सन २०१५-१६ मध्ये तरतूद केली गेली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निम्न तापी प्रकल्पासाठी जास्तीत जास्त निधी मंजूर करुन प्रकल्पाचे काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-०८-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

सन २०१५-१६ मध्ये रुपये २०.०० कोटीची तरतूद करण्यात आली होती.

(४) निम्न तापी प्रकल्पाकरीता सन २०१६-२०१७ मध्ये अतिरिक्त निधीसह एकूण रुपये ६८ कोटी निधीची तरतुद करण्यात आलेली आहे. मार्च, २०१७ अखेर यातून रुपये १६.५४ कोटी खर्च झालेला आहे. उर्वरित रुपये ५१.४६ कोटी निधी सन २०१७-२०१८ मध्ये खर्चाकरीता उपलब्ध असून, सन २०१७-१८ मध्ये रुपये २५ कोटी निधीची तरतुद करण्यात आल्याने एकूण रुपये ७६.४६ कोटी निधी खर्चाचे नियोजन करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हतनूर प्रकल्पावरील महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत अपूर्ण असलेली कामे पूर्ण करण्याबाबत

**(२८) ८३६९० (२०-०४-२०१७). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हतनूर प्रकल्पावरील महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत अपूर्ण असलेली कामे पूर्ण करुन देण्यासंदर्भात जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान कार्यकारी संचालक व मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांना पत्र दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पातंर्गत अपूर्ण असलेली कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-०८-२०१७) :** (१) होय.
(२) सन २०१६-१७ या वर्षात कालवा स्वच्छता मोहिमे अंतर्गत हतनुर कालवा १ ते ९२ आणि त्यावरील पाणी वापर संस्था याचे दुरुस्तीचे काम पाखरण कार्यक्रमांतर्गत अंतर्भूत करण्यात आले आहे.
सदर अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर आवश्यक अंदाजपत्रके तयार करणेची कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी नियुक्ती करण्यात आलेल्या ग्रामरोजगार सेवकाच्या विविध मागण्यांबाबत

**(२९) ८३७६४ (१५-०४-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी प्रशासन व नोंदणीकृत मजूर यामधील दुवा म्हणून ग्रामरोजगार सेवकाची नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्या कामानुसार त्यांना योग्य मोबदला मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,जिल्हा कार्यकारणीने ग्रामरोजगार सेवकांना दरमहा किमान वेतन देण्यात यावे, तसेच अन्य राज्यांप्रमाणेच या सेवकांना शासन सेवेत सामावून घ्यावे इ. मागण्या केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागण्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२५-०९-२०१७) :** (१) हे खरे नाही, कामाच्या प्रमाणात मोबदला देण्यात येतो.
(२) हे खरे आहे.
(३) ग्राम रोजगार सेवकांच्या मागण्यांबाबत दि.२४ मार्च,२०१७ रोजी माझ्याकडे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत :-

१) ग्राम रोजगार सेवकांचे मानधन ६० दिवसांच्या आत त्यांच्या खात्यात जमा करण्यात यावे.

२) मानधनाबाबतचा सविस्तर प्रस्ताव संघटनेने शासनास सादर करावा.

३) ग्राम रोजगार सेवकांना काढून टाकण्याबाबत गट विकास अधिकारी यांनी चौकशी करावी.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हिंगोली जिल्हयासाठी रस्ता दुरुस्ती अनुदान न मिळाल्याने रस्त्याची झालेली दुरवस्था

**(३०) ८३८१९ (१५-०४-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयासाठी ३०५४ अंतर्गत रस्ता दुरुस्ती अनुदान मागील वर्षी दिले नसल्यामुळे तेथील रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने सदर रस्ता दुरुस्तीचे प्रस्ताव दाखल केले असून अद्याप प्रस्ताव मंजूर करुन निधी दिलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची पाहणी केलेली आहे काय व पाहणीवरुन रस्ता दुरुस्तीसाठी अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०९-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही. हिंगोली जिल्ह्यास सन २०१६-१७ मध्ये लेखाशिर्ष ३०५४ जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत रु.९००.०० लक्ष व ३०५४ रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण गट ब व क अंतर्गत रु.५५८.८४ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून मंजूर कामांच्या निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामे प्रगतीत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे आडसुळवाडी (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथे इंदिरा आवास घरकुल योजनेतील रक्कमेत झालेला गैरव्यवहार**

**(३१) ८४४२१ (२०-०४-२०१७). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आडसुळवाडी (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथील श्रीमती संताबाई नारायण आडसूळ यांना इंदिरा आवास घरकुल योजनेत मंजूर झालेले घर त्यांनी बांधलेले नसतांनाही त्यांच्या नावे इतर एका व्यक्तिने ५० हजार रुपये घेतल्याची तक्रार दिनांक २३ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास त्यांच्या मुलानी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., उस्मानाबाद यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार लाभार्थ्यांची व शासनाची फसवणूक करुन पैसे उचलणाऱ्या दोषींवर कारवाई करण्यासह लाभार्थ्यांना पुन्हा घरकुल बांधण्यासाठी अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०९-२०१७) :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी विस्तार अधिकारी (पंचायत) यांनी केलेल्या चौकशीत अहवालात पुढील बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. श्रीमती. संताबाई आडसूळ यांना सन २०१०-११ मध्ये इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकुल मंजूर करण्यात आले होते. तथापि, दि.०९.०९.२०१४ रोजी त्या मयत झाले असल्यामुळे त्यांच्या वारसदाराने घरकुल बांधकामासाठी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळब यांचेकडे कागदपत्र सादर करणे आवश्यक होते.

२. मयत लाभार्थी श्रीमती. संताबाई आडसूळ यांचे मुलांने वारसाहकासाठी कोणतेही कागदपत्रे सादर न केले असतानादेखील त्यांना रु. ५०,०००/- घरकुल बांधकामासाठी मंजूर करण्यात आले.

३.सदर प्रकरणी श्री.ए.के. काळे, मिस्त्री ग्रेड-२ व तत्कालीन ग्रामसेवक श्री. मिटकरी हे कर्मचारी दोषी आढळून आले आहेत.

(३) मयत लाभार्थी श्रीमती. संताबाई आडसूळ यांचे मुलांकडून रु.५०,०००/- वसूल करण्याची कार्यवाही पंचायत समिती स्तरावर प्रस्तावित आहे.

दोषी कर्मचारी श्री.ए.के. काळे, मिस्त्री ग्रेड-२ यांना घरकुल मंजूरीबाबत संचिका व देयक योग्य पद्धतीने न हाताळल्यामुळे त्यांचे निलंबन केले आहे. तसेच, तत्कालीन ग्रामसेवक श्री. मिटकरी यांची एक वेतनवाढ रोखण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

मयत लाभार्थी श्रीमती. संताबाई आडसूळ यांचे वारसदार असलेल्या श्रीमत नारायण आडसूळ व बापू नारायन आडसूळ यांनी कोर्टाचे वारस प्रमाणपत्र व जागेचा मालकी उतारा सादर केल्यानंतर घरकुलाचा निधी लाभार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अक्कलकोट (जि.सोलापूर) येथील पंचायत समितीमधील शौचालयाची झालेली दुरवस्था**

**(३२) ८४५५९ (२०-०४-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकोट (जि.सोलापूर) येथील पंचायत समितीमधील शौचालयाची अतिशय दुरवस्था झाल्यामुळे परिसरात अतिशय दुर्गंधी पसरल्यामुळे तेथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार दुरवस्था झालेल्या शौचालयाची त्वरीत दुरुस्ती करण्यासह शौचालयाच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०९-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे गोविळ मुळवाडी (हसोळ कोंडवाडी) ते शिपोशी कुरुपवाडी (ता.लांजा, जि.रत्नागिरी) हा जोड रस्ता तयार करण्याबाबत**

**(३३) ८४६१९ (२०-०४-२०१७). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गोविळ मुळवाडी (हसोळ कोंडवाडी) ते शिपोशी कुरुपवाडी (ता.लांजा, जि.रत्नागिरी) हा जोड रस्ता तयार करुन देण्याबाबत या भागातील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निवेदने देऊनही अद्यापपर्यंत रस्त्याचे काम करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर जोड रस्ता तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०९-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर रस्त्याची पहाणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली असून मौजे गोविळ मुळवाडी (हसोळ कोंडवाडी) ते शिपोशी कुरुपवाडी हा रस्ता योजनाबाह्य रस्ता असून पायवाट स्वरुपाचा आहे. या रस्त्याची एकूण लांबी ०.६०० कि.मी. आहे. हा रस्ता नवीन तयार करणे व ०/२०० कि.मी. मध्ये नवीन कॉजवे बांधणे यासाठी रु.३०.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे.

हा रस्ता योजनाबाह्य रस्ता असल्याने कोणत्याही योजनेतून प्रस्तावित करता येत नाही. तथापि, सदरचे काम लोकप्रतिनिधी यांनी स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सूचविल्यास व त्यास मंजूरी प्राप्त झाल्यास जिल्हा परिषदेमार्फत करणे शक्य आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य स्तरावर पंचायत राज अभ्यास गटाने जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायतींमध्ये केलेल्या बदलाबाबत**

**(३४) ८४७१७ (२०-०४-२०१७). श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या शिफारशीवरुन राज्य शासनाने राज्य स्तरावर पंचायत राज अभ्यास गट नियुक्त केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अभ्यासगटाने जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत यात कोणते बदल करण्याच्या शिफारशी केलेल्या आहेत,

(३) असल्यास, या शिफारशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१७) :** (१) होय, या विभागाच्या दि. १८ जुलै, २०१७ अन्वये पंचायतीराज विभागाचा दुरगामी आराखडा तयार करण्यासाठी तज्ञ गट समितीची स्थापना करण्यात आली आहे.

(२) व (३) सदर तज्ञ गट समितीच्या कार्यकालास दि. ३० जून, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून, सदर समितीचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात जीवनावश्यक औषधांना जीएसटीतून सवलत मिळण्याबाबत**

**(३५) ८५०४३ (२२-०८-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जुलै, २०१७ पासून जीएसटीमुळे अत्यावश्यक औषधे महागणार असल्याची माहिती माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या औषधांवर जीएसटीतील करवाढीमुळे औषध विक्री कंपन्यांसमोर दरवाढीशिवाय पर्याय राहणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार जीवनावश्यक औषधांच्या किंमतीवर नियंत्रण आणण्यासाठी अशा औषधांवर सूट देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-१०-२०१७) :** (१) हे खरे नाही. जीएसटीअंतर्गत अत्यावश्यक औषधावर ५% (सीजीएसटी + एसजीएसटी) दराने तर इतर औषधांवर १२% कर दराची निश्चिती करण्यात आली आहे. सदर कराचा दर जीएसटीपूर्व कराच्या दराइतकाच असल्याने औषधाच्या किंमतीत वाढ झालेली नाही.

(२) हे खरे नाही. जीएसटीअंतर्गत कराचे दर जीएसटीपूर्व कराच्या दराइतकेच असल्यामुळे किंमत वाढविण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) लागू नाही.

(४) लागू नाही.

---

**कोकण वैधानिक विकास महामंडळाच्या स्थापनेच्या प्रस्तावाबाबत**

**(३६) ८५४०७ (१९-०८-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण वैधानिक विकास महामंडळाच्या स्थापनेसाठी राज्य शासन केंद्र सरकारकडे पाठपुरावा करेल अशी घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ११ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा प्रस्ताव अद्याप केंद्र सरकारकडे पाठविण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव सादर केला असल्यास केंद्र शासनाने त्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०९-२०१७) :** (१) होय.

(२), (३) व (४) कोकणाकरिता स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्याकरिता भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३७१ (२) मध्ये सुधारणा करणे आवश्यक असून सदर बाब केंद्र शासनाच्या अखत्यारित आहे. त्यानुषंगाने, कोकणाकरिता स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्यासंदर्भात केंद्र शासनाकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावावर लवकर निर्णय घेण्याची विनंती मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक १७ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाकडे केली आहे.

---

**विदर्भात वित्त विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रिक्त पदांबाबत दिलेली चुकीची माहिती**

**(३७) ८५५३३ (१२-०८-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात वित्त विभागातील सहाय्यक लेखाधिकारी गट ब संवर्गातील ५१ पदे रिक्त असंताना मुंबईस्थित संचालकांनी केवळ १० पदे रिक्त असल्याचे शासनास दर्शवून याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती देवून फसवणूक केली असल्याची माहिती दिनांक ११ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबई, पुणे, नाशिक विभागात १०० पेक्षा अधिक पदे रिक्त दर्शविण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार रिक्त पदांबाबत चुकीची माहिती देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-१०-२०१७) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहाय्यक लेखाअधिकारी गट-ब (राजपत्रित) संवर्गातील पदे ही २०% पदोन्नती व ८०% निवडीने नियुक्तीव्दारे भरली जातात. शासन अधिसुचना दि.२८.०४.२०१५ व दि.१६.०७.२०१५ अन्वये सरळसेवा / पदोन्नतीने महसुली विभागनिहाय पदे भरण्याची तत्वे विशद केली आहेत व प्रत्येक सेवाभरतीचा प्रस्ताव त्याच्या अधिनच तयार करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहाय्यक लेखाअधिकारी गट-ब (राजपत्रित) यांच्या बाबतीत सध्या अस्तित्वात असलेले पदभरतीचे प्रमाण ८०% निवडीने नियुक्ती २०% पदोन्नती असल्यामुळे २०% प्रमाणे पदोन्नतीच्या कोटयातील पदांचा विचार करण्यात आलेला असुन त्याप्रमाणे कमी प्रमाणामध्ये पदोन्नती कोटयामधील पदे विदर्भात उपलब्ध असल्याचे स्पष्ट आहे.
(२) हे खरे आहे. २०% पदोन्नतीच्या कोटयाअतंर्गत मुंबई,पुणे व नाशिक विभागात १०० पेक्षा अधिक पदे रिक्त होती.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मोताळा (जि.बुलढाणा) तालुक्यातील ३३ ग्रामपंचायतींना इमारत नसल्याबाबत**

**(३८) ८६३०५ (२१-०८-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील तब्बल २०८ तर मोताळा तालुक्यातील ३३ ग्रामपंचायतींना इमारत नसल्याने ग्रामपंचायतीचे कामकाज करण्यास गैरसोईचे होत असल्याची बाब दिनांक १० एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार ग्रामपंचायतींना इमारत उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०९-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सन २०१२-१३ ते २०१४-१५ या कालावधीत केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्राम योजनांतर्गत २८५ व राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानाअंतर्गत ७०० अशा एकूण ९८५ ग्राम पंचायत इमारत बांधकामाकरीता मंजूर तरतूदीप्रमाणे निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

परंतू, केंद्र शासनाने राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानास सन २०१५-१६ पासून केंद्राच्या अर्थसंकल्पातून वगळण्याचा निर्णय घेतला आहे. सन २०१६-१७ पासून राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानामध्ये अंशत: बदल करुन राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान या नावाने योजना सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे.

सदर अयानामध्ये केंद्र शासनाकडून ग्राम पंचायत इमारत बांधकामासाठी तरतूद नाही. तसेच, श्री. बाळासाहेब ठाकरे योजनेअंतर्गत ग्रामपंचायतींना इमारतीसाठी सहायता करणेचा component (घटक) विचाराधीन आहे.

परंतु, संबंधित जिल्हा परिषदेने ग्रामपंचायत इमारत बांधकाम हाती घेण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडे निधीची मागणी केलेली असून, सदरचा निधी प्राप्त झाल्यास ग्रामपंचायत इमारत बांधकाम सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात हाती घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी मिळण्याबाबत**

**(३९) ८६८१७ (१२-०८-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी तसेच दुष्काळाने ग्रासलेल्या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्र्यांनी नीती आयोगाच्या झालेल्या बैठकीमध्ये १० हजार ६८४ कोटी रुपयांची विशेष पॅकेजची मागणी केल्याची बाब माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रक्कम तात्काळ मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०९-२०१७) :** (१) होय.
(२) याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. मा. मुख्यमंत्री महोदयांनी मा. पंतप्रधान, मा. सुश्री. उमा भारती, केंद्रीय जलसंसाधन मंत्री व मा. श्री. अरुण जेटली, केंद्रीय वित्त मंत्री यांना निधी मिळणेसाठी पत्राद्वारे विनंती केली आहे. तसेच मा. पंतप्रधान, मा. सुश्री. उमा भारती, केंद्रीय जलसंसाधन मंत्री व मा. श्री. अरुण जेटली, केंद्रीय वित्त मंत्री यांची नवी दिल्ली येथे प्रत्यक्ष भेट घेऊन सदर पॅकेज मंजुरीसाठी विनंती केली आहे. मा. जलसंपदा मंत्र्यांनी सुद्धा याबाबत पत्रान्वये व प्रत्यक्ष भेटून पाठपुरावा केला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिराळा, वाळवा व कराड या तीन तालुक्यांमध्ये**
**बंद पाईपलाईनचे काम करण्याबाबत**

**(४०) ८८६४६ (२१-०८-२०१७). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिराळा, वाळवा व कराड या तीन तालुक्यांना वरदान करणा-या वाकुर्डे बु. उपसा जलसिंचन योजनेच्या टप्पा १ व २ मधून पाणी उचलून मोरणा व मांड नदीमध्ये सोडण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत पुढील १० ते २७ कि.मी. मधील कालवा खोदण्याचे काम रद्द करुन त्याऐवजी बंद पाईपलाईन टाकण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाईपलाईनचे काम माहे मार्च, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३) वाकुर्डे-रेड कालवा कि.मी. ११ ते २७ व त्यावरील शाखा कालवे बंद नलिकेद्वारे करण्याचे प्रस्तावित असून त्यास महामंडळाने दि. १४.६.२०१७ अन्वये तत्वत: मान्यता दिलेली आहे. त्यानुसार लाभक्षेत्राचे सविस्तर सर्वेक्षण, निविदे अंतर्गत सर्वेक्षणाचे काम प्रगतीत आहे. तद्नंतर बंद नलिका कामाच्या सविस्तर संकल्पनास व अंदाजपत्रकास सक्षम स्तरावरुन मान्यता घेवून निविदा कार्यवाही पुर्ण करुन माहे मार्च, २०१८ पूर्वी काम हाती घेण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्हयातील वारणा प्रकल्पाच्या उजव्या व डाव्या कालव्याची कामे अपुर्ण असल्याबाबत

**(४१) ८८६५२ (२१-०८-२०१७). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील वारणा प्रकल्पाच्या धरणाचे काम पूर्ण झाले असून प्रकल्पाच्या उजव्या व डाव्या कालव्याची कामे अपुर्णावस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच उजव्या व डाव्या कालव्याची कामे पंतप्रधान जलसिंचन योजनेंतर्गत करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१७) :** (१) होय.

(२) सांगली जिल्हयातील वारणा प्रकल्पाचा पंतप्रधान कृषी सिंचाई योजनेअंतर्गत कामांचा पूर्णत्वाचा अहवाल दिनांक ८/६/२०१७ रोजी केंद्र शासनास सादर करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील चांदूर रेल्वे येथील ग्रामपंचायत मांजरखेड कसबा येथील सरपंच व सचिव यांनी केलेल्या गैरकारभाराबाबत**

**(४२) ८८८६५ (२२-०८-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील चांदूर रेल्वे येथील ग्रामपंचायत मांजरखेड कसबा येथील सरपंच व सचिव ग्रा.प यांच्या मनमानी कामकाजाबाबत व ग्रा.प.स्तरावरील सन २०१३ रोजी पासून झालेल्या कामाबाबत वारंवार तक्रारी होत असतानाही त्याबाबत दुर्लक्ष करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार सरपंच व सचिव यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-१०-२०१७) :** (१) नाही.

परंतू, मा.आमदार प्रा. विरेंद्र जगताप (धामणगांव रेल्वे) विधानसभा क्षेत्र यांनी दि.१०/०१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये गटविकास अधिकारी, चांदूर रेल्वे यांच्याकडे तक्रार केली आहे.

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांनी ग्रामपंचायतीमध्ये जाऊन अभिलेखाची तपासणी व चौकशी केली असता, खालील गोष्टींमध्ये अनियमितता आढळून आली.

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित वस्तीतील क्राँकिट रस्त्याचे लोकेशनला दि.११/०१/२०१६ रोजी मंजूरी प्राप्त झाली व त्यास अनुसरुन ग्रामपंचायत मासिक सभा ठराव क्रमांक ८, दि.२२/०३/२०१६ नुसार कामास मंजुरी घेण्यात आली. सदर काम करताना ऑनलाईन पद्धतीने निविदा मागविण्यात आल्या. परंतु, प्रत्यक्षात B-१ करार पद्धतीने खुल्या निविदेने काम केल्याचे आढळून आले आहे. सदर निविदेस सभेमध्ये मंजूरी दिल्याचे आढळले नाही. सदरचे काम पूर्ण होऊन मुल्यांकन करुन पुर्णत्वाचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. तसेच महात्मा फुले वस्तीमध्ये केलेल्या क्राँक्रिट रस्ता बांधकामामध्ये अनियमितता आढळून आली नाही.

२) सन २०१५-१६ मध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत केलेल्या कामामध्ये ग्रामपंचायतीने आधी खर्च करुन नंतर निविदा मंजूर केल्या आहेत.

३) सन २०१५-१६ मध्ये कोंडवाडा दुरुस्तीबाबतची कुठलीच नस्ती सचिवाने तपासणी करीता दर्शविली नाही.

४) १३ व्या वित्त आयोगाच्या निधीतून पी.व्ही.सी. पाईप नाली बांधकाम बी-१ करार पद्धतीने करण्यात आले असून त्यास मासिक सभेत मंजुरी घेण्यात आली नाही.

(३) चौकशीमध्ये आढळून आलेल्या अनियमिततेस तत्कालिन कंत्राटी ग्रामसेवक जबाबदार असून, त्यांना सक्त ताकीद देण्यात आली आहे. तसेच अन्य जबाबदार असलेल्या २ ग्रामसेवकांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात थांबविण्यात आली आहे. सरपंच, ग्रामपंचायत,मांजरखेड- कसबा यांचेविरुद्ध महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ३९ (१) नुसार कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडा अंतिम करण्याबाबत**

**(४३) ८९१९७ (२१-०८-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडा अंतिम करण्यासाठी शासनाने दिनांक १२ एप्रिल, २०१६ रोजी गठीत केलेल्या तज्ञ समितीने सदर जल आराखडा अंतिम करुन शासनास सादर केलेला आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर आराखड्यास राज्य जल परिषदेची मान्यता घेण्यात आली आहे काय,
(३) असल्यास,एकात्मिक जल आराखडा अध्याप अंतिम केलेला नसल्यास कालमर्यादा लक्षात घेता तात्काळ सदर आराखडा अंतिम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-१०-२०१७) :** (१) होय.

गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडा अंतिम करण्यासाठी स्थापित तज्ञ समितीचा अहवाल व गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडा दि.१३/०७/२०१७ रोजी गोदावरी नदी खोरे अभिकरणामार्फत शासनास सादर करण्यात आला आहे.
(२) व (३) गोदावरी नदी खोरे अभिकरणाकडून शासनास सादर करण्यात आलेला गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडा मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दि.०७/०८/२०१७ रोजी झालेल्या राज्य जल मंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवण्यात आला. सदर बैठकीत सुचविण्यात आलेल्या शिफारशी विचारात घेऊन मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील राज्य जल परिषदेच्या बैठकीत गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखड्यास मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विविध विकास प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या प्रकल्प नियंत्रण प्रणालीबाबत**

**(४४) ८९५८८ (२१-०८-२०१७). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या विविध विकास प्रकल्पांचे प्रत्यक्ष किती काम झाले याचा संपुर्ण तपशील सादर केल्या शिवाय कंत्राटदारांना पैसे मिळणार नाहीत अशी प्रकल्प नियंत्रण प्रणाली शासनाने तयार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नियंत्रण प्रणालीमुळे बनावट कामे दाखवून त्याची बनावट देयके सादर करुन सरकारी निधीचा अपहार करणाऱ्यावर आळा बसावा यासाठी ही प्रणाली तयार करुन राज्याच्या सर्वच विभागांच्या विविध योजनांसाठी विभागांच्या सचिव व मुख्याधिकारी यांना पाठविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पातील कामांवर होणारा खर्च व प्रकल्पाच्या कामाची सद्यःस्थिती यावर अंकुश ठेवण्यासाठी मंत्रालयात स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वीत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, सदर यंत्रणा तात्काळ कार्यान्वीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०९-२०१७) :** (१) हे खरे नाही.

राज्य शासनाच्या विविध प्रकल्पांचे प्रत्यक्ष किती काम झाले याबाबत राज्य शासनाच्या अर्थसंकल्पिय योजनांसाठी पुराव्यावर आधारित प्रकल्प सनियंत्रण प्रणाली (Evidance Based Project Monitoring System) विकसनाचे काम हाती घेण्यात आले असून सदर प्रणाली अद्याप विकसित झालेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सदर प्रणाली विकसनासाठी प्रशासकीय विभागांची पायाभूत सुविधा योजना व लाभार्थी केंद्री योजनांच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती अभ्यासणे व त्याअनुषंगाने अहवाल सादर करण्यासाठी मे.के.पी.एम.जि.लि. या सल्लागार संस्थेची नियुक्ती करण्यात आली असून सदर सल्लागार संस्थेच्या अहवालानंतर प्रणाली विकसित होणे अपेक्षित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयातील वसमत, कळमनुरी व औंढा येथील लघुपाटबंधारे कार्यालये बंद असल्याबाबत**

**(४५) ८९८३४ (१८-०८-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयाचा सिंचन अनुशेष कमी करण्यासाठी वसमत, कळमनुरी व औंढा येथे लघुपाटबंधारे कार्यालयाचे उद्घाटन होऊनही ती अद्याप बंद अवस्थेत असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर कार्यालयांना आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देऊन ही कार्यालये पूर्ववत कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-१०-२०१७) :** (१) होय. अंशतः खरे आहे.
(२) कार्यभार हस्तांतरण प्रक्रियेदरम्यान माहे मार्च २०१७ मध्ये अंदाजे ३ ते ४ दिवसाच्या कालावधीकरिता कार्यालये बंद होती.
सदर कार्यालये आता कार्यान्वित झालेली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विविध प्रशासकीय विभागतंर्गतच्या विमुक्तजाती, भटक्या जमाती,विशेष मागासप्रवर्ग इतरमागास जाती प्रवर्ग यासाठी राज्यातील जिल्हास्तरावर स्वतंत्र विभागाची नेमणूक करण्याबाबत

**(४६) ९००५६ (१६-०८-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विविध प्रशासकीय विभागातंर्गतच्या विमुक्तजाती, भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग इतर मागास जाती प्रवर्ग यासाठी राज्यातील जिल्हास्तरावर स्वतंत्र विभागाची नेमणूक करण्यात येऊन त्यात विमुक्त जाती व भटक्या जातीच्या सदस्यांना अशासकीय सदस्य म्हणून नामनियुक्त करण्याची.मागणी सदर समाजवर्गातील लोकप्रतिनिधी व सेवाभावी संघटनांचे पदाधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (सामाजिक न्याय) मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय) संबंधित जिल्हयांचे जिल्हा पालकमंत्री तथा जिल्हा संपर्क मंत्री आणि प्रधान सचिव (सामाजिक न्याय) यांच्याकडे दिनांक २५ एप्रिल,२०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे मे, २०१७ अखेरपर्यंत किती जिल्हा समाज कल्याण प्रशासनाकडून वा समाजकल्याणालय व त्यांचा अधीनस्त असलेल्या समाजकल्याण उपसंचालनालयाचे प्रादेशिक कार्यालये (बृहन्मुंबई, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, पुणे, नागपूर) यांच्याकडून या संदर्भातील प्रस्ताव शासनास प्राप्त झाले आहे व त्यापैकी किती प्रस्तावास माहे जून, २०१७ पर्यत तत्वतः मंजुरी प्रत्यार्पित करण्यात आली आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१०-१०-२०१७) :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील भातपिकाखालील जमिनी बाधीत होत असल्याने खारभूमी योजनांना मान्यता देणेबाबत**

**(४७) ९११९२ (१४-०८-२०१७). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हा हा भातपिकाचा कोठार म्हणून प्रसिध्द असताना जवळपास १०० वर्षापूर्वीपासून खाडीलगत असलेल्या भातपिकाखाली खारजमिनी मोठ्या प्रमाणावर बाधीत होत असल्याने परिसरातील शेतकऱ्यांनी नापिक झालेल्या जमिनी पुर्नलागवडीखाली येण्यासाठी खारभूमी योजनांना मान्यता देवून निधी उपलब्ध करावा अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील खार जमिनी लगत असलेल्या बांधबंदिस्तीसाठी निधी उपलब्ध नसल्याने भात पिकाखालील जमिनीच्या बाधीत क्षेत्रामध्ये वाढ होवू नये या दृष्टीने शासन प्रस्तावित योजनांना तसेच दुरूस्तींना मान्यता देवून निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१६-०९-२०१७) :** (१) होय.
(२) रायगड जिल्ह्यातील गोफाण, मुरुड आंबोली, साई, वढाव बोर्झे व जुई धमकडी या ५ खारभूमी योजनांच्या नुतनीकरणाचे कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. त्यापैकी गोफाण योजनेची निविदा प्रकिया प्रगतीपथावर असून, उर्वरित योजनांची तांत्रिक मान्यता घेण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

मौजे माणकुळे सोनकोठा व हाशिवरे येथील प्रस्तावित खारभूमी योजना असून प्रशासकीय मान्यतेच्या प्रक्रियेत आहेत.

रायगड जिल्ह्यातील खारभूमी योजनांकरिता सन २०१७-१८ मध्ये मुळ बांधकाम अंतर्गत रु ५७२.३६ लक्ष तरतूद आहे. यापैकी गोफाण योजनेच्या कामासाठी रु ६०.०० लक्ष अर्थसंकल्पिय तरतूद आहे. उपलब्ध तरतुदीतून नूतनीकरणाची कामे करण्यात येणार आहे.

रायगड जिल्ह्यातील खारभूमी योजनांकरिता सन २०१७-१८ मध्ये वाढ व विस्तार अंतर्गत रु ३६८.२१ लक्ष व परिरक्षण व दुरुस्ती अंतर्गत रु.१३३.४० लक्ष ची अर्थसंकल्पिय तरतूद असून १० वर्षापासून पूर्ण झालेल्या व दुरुस्ती आवश्यक असलेल्या योजना यातून सुधारणा व दुरुस्ती करण्यात येणार आहे.

रायगड जिल्ह्यातील नारवेल बेनवले, माणकुळे, जांभुळटेप व सोनखार उर्णोली या योजनांची तातडीची दुरुस्ती यांत्रिकी विभागामार्फत करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ट्रॅक्टरवरील जीएसटी कमी करण्याच्या मागणीबाबत**

**(४८) ९१३३६ (१९-०८-२०१७). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ट्रॅक्टरच्या काही सुट्या भागांवर २८ टक्के वस्तू व सेवा कर (जीएसटी) लावण्याचे केंद्र शासनाने जाहीर केलेले आहे. त्यामुळे ट्रॅक्टरच्या निर्मिती खर्चात २५ हजारांची वाढ होऊन त्याचा अप्रत्यक्षपणे नुकसान कृषी क्षेत्राला मुख्यतः खरेदीदार शेतकऱ्यांना होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास,ट्रॅक्टरच्या सर्व सुट्या भागांवर १८ टक्केच जीएसटी लावण्यात यावा अशी मागणी ट्रॅक्टर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (टिएमए) ने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-१०-२०१७) :** (१) हे खरे नाही. दिनांक १८ ऑगस्ट २०१७ रोजी केंद्र शासनाने व राज्य शासनाने अधिसूचना निर्गमित केली आहे. अधिसूचनेद्वारे ट्रॅक्टरच्या सुट्या भागावर एकत्रित १८% दराने आकारणी होईल.

(२) होय.

(३) केंद्र शासनाने व राज्य शासनाने दिनांक १८ ऑगस्ट, २०१७ रोजी अधिसूचना निर्गमित करुन ट्रॅक्टरच्या सुट्या भागावरील एकत्रित कराचा दर १८% केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील आजनसरा बॅरेजचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(४९) ९२४६४ (१८-०८-२०१७). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील आजनसरा बॅरेजला मंजुरी मिळाली असूनही अद्याप काम सुरू करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बॅरेजला प्रशासकीय मंजुरी केव्हा मिळाली आहे व निविदेचा कालावधी काय आहे,

(३) असल्यास, या बॅरेजचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-१०-२०१७) :** (१) होय,

(२) आजनसरा बॅरेज प्रकल्पास मूळ प्रशासकिय मान्यता शासन निर्णय दि.२३ एप्रिल २००० अन्वये सन १९९६-९७ च्या दरसूचीनुसार रू १५८.२१ कोटी करिता प्राप्त होती. ती व्यपगत झाल्याने शासनाने दि.२८. नोव्हेंबर २००६ ला सन २००५-०६ चे दरसूचीनुसार रू.२०८.४२ कोटीस नव्याने प्रशासकिय मान्यता प्रदान केली आहे. या प्रकल्पास केंद्रीय जलआयोगाची मान्यता, पर्यावरण मंत्रालयाची मान्यता तसेच वन प्रस्तावास अंतिम मान्यता प्राप्त नसल्याने प्रकल्पाच्या कामांची निविदा काढण्यात आली नाही.

(३) प्रकल्पाचे काम हाती घेण्यापूर्वी खालील मान्यता घेण्याची कार्यवाही करणेत येत आहे.

१) पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्रस्ताव मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांना पाठविण्यात आला असून त्यांनी उपस्थित केलेल्या मुददयांची त्रुटी पूर्तता सुरू आहे.

२) पर्यावरणविषयक मान्यतेच्या प्रस्तावास प्रकल्पाचे टी.ओ.आर. ला केंद्र शासनाचे पर्यावरण मंत्रालयाची मान्यता दि. ११.०७.२०१७ रोजी प्राप्त झाली आहे. पर्यावरण अंतिम मान्यता घेणेसाठीची कार्यवाही चालू आहे.

३) प्रकल्पाकरिता आवश्यक असलेल्या ३१.५६ हेक्टर वनजमिन हस्तांतरणास दि.२५.०८.२००८ रोजी वनविभागातर्फे तत्वत: मान्यता मिळाली असून अंतिम मान्यतेसाठीचा प्रस्ताव दि. ०३.०६.२०१६ रोजी सादर करण्यात आला. अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर, यांचे दि. २०.०९.२०१६ चे पत्रान्वये उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुषंगाने पर्यायी वनीकरणाकरिता रू.९१.७० लक्ष वाढीव निधीचा भरणा दि. २९.१०.२०१६ रोजी करण्यात आला. इतर मुद्यांचे अनुपालन अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करण्याचे दृष्टीने वनप्रस्ताव उपवन संरक्षक वर्धा यांना दि. २८.१०.२०१६ रोजी फेर सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावावरील त्रुटींच्या अनुषंगाने कॅट प्लान दोन महिन्यात तयार करुन सक्षम प्राधिकरणाकडून मंजुरी प्राप्त होताच निधीचा भरणा करण्यात येईल व कॅट प्लान चे काम प्रकल्पाच्या कामासोबतच कार्यान्वित करण्यात येईल असे कळविण्यात आले आहे. त्यानुसार वनजमीन संपादन अंतिम मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा याबाबत मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) यांना विनंती करण्यात आली आहे.

वरील वैधानिक बाबींची पूर्तता करुन निधीच्या उपलब्धतेनुसार या प्रकल्पाचे काम पूर्ण करणेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शेतीला पाणी वितरण करणाऱ्या नलिका वितरण प्रकल्पाबाबत**

**(५०) ९३३३७ (२१-०८-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सिंचन पद्धतीमध्ये सुधारणा करून वितरिका ऐवजी नलिकांद्वारे शेतीला पाणी वितरण करण्याचा निर्णय दिनांक ९ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बदलामुळे पाणी वापर क्षमतेत वाढ होईल व नलिका वितरण पद्धतीमुळे प्रकल्पांच्या खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्प खर्चात वाढ होणाऱ्या योजनेला मान्यता देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-१०-२०१७) :** (१) होय.

राज्यासाठी नलिकाव्दारे सिंचन वितरण प्रणाली धोरणाबाबतचा शासन निर्णय दिनांक ०९.०६.२०१६ रोजी निर्गमित करण्यात आला होता. सदर सिंचन प्रणालीच्या जलद व कार्यक्षम अंमलबजावणीसाठी सर्व संबंधितांच्या कार्यशाळेत प्राप्त शिफारशीस अनुसरुन दिनांक ०९.०६.२०१६ रोजीच्या शासन निर्णयात अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यासाठी अंशत: सुधारणा करण्यात आली असून सुधारित शासन निर्णय दिनांक १३.०१.२०१७ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. तसेच दिनांक ०२.०२.२०१७ रोजीच्या परिपत्रकान्वये नलिकेव्दारे वितरण प्रणालीबाबतचे सविस्तर निकष / मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(२) नलिका सिंचन वितरणामुळे उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा नियंत्रित व कार्यक्षम वापरामुळे पाणी वापर क्षमतेत वाढ अपेक्षित आहे.

या प्रणालीमुळे भूसंपादनाची गरज राहणार नाही. याव्यतिरिक्त पारंपारिक कालवा प्रणालीवरील बांधकामाचा खर्च, देखभाल-दुरुस्ती व परिचलनाचा खर्च या बाबींच्या तुलनेत नलिका सिंचन वितरण प्रणाली आर्थिकदृष्टया किफायतशीर ठरु शकते. तसेच या धोरणानुसार बंद पाईपचा खर्च प्रकल्पाच्या नियमित अनुदानामधून केला जाणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.